Vol 3 Issue 9 Oct 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-9, Oct-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# बाबुराव बागुल यांच्या कथेतील बालव्यक्तिरेखा

**जयश्री पवार**
जिजामाता विद्यालय भेंडे ता नेवासा जि अहमदनगर

***सारांश :***बाबुराव बागुल यांच्या कथेत फार बालव्यक्तिरेखा आलेल्या नाहित. बालमनाच्या मानसिक अवस्थांचे चित्रण बाबुराव बागुल अतिशय हळूवारपणे करतात. या सर्वातून बालमनाचा होणारा कोंडमारा चित्रित केला आहे.

***प्रस्तावना :***

'बाबुराव बागुल' हे दलित लेखक, कवी, कथाकार, समीक्षक म्हणून ज्ञात आहेत. पण ते लोकप्रिय झाले ते कथा लेखक म्हणून. बाबुराव बागुल यांनी दलित कथेला मानाचे स्थान मिळवून दिले. बागुल हे अस्पृश्य असल्याने त्यांच्या वाट्याला दुःख, दैन्य व दास्य आले त्यामुळे त्यांच्या मनात स्पृश्य समाजाविषयी अंगार भडकतो. बागुलांच्या कथेतून दलितांवरील अन्याय व अत्याचार ह्याविरूद्ध पराकोटीची चीड शब्दाशब्दातून व्यक्त होते. ह्या संतापाचे व चिडेचे प्रतिबिंब त्यांच्या कथेत उमटले आहे. बागुलांची आक्रस्ताळी व भडकही वाटते. त्यांच्या कथेतून वास्तवतेचे भयानक दर्शन घडते. या भयानक जीवनाला येथील प्रचलित समाजव्यवस्था जबाबदार आहे असे बागुलांना वाटते. बागुलांच्या बहुतेक कथा व्यक्तिकेंद्री असतात. ही माणसे चारचौघांसारखी सामान्य नसतात. त्यांना पोटाची भूक असते तशीच लैंगिक भूकही असते. ही भूक रूढ मार्गाने कधीच भागत नाहीत.

## *2.2.बाबुराव बागुल यांच्या कथांतील बालमनाचे स्वरूप*

बाबुराव बागुल यांच्या कथांबाबत दलित साहित्याचे अभ्यासक डॉ. अनिल गजभिये म्हणतात, "माणसाला केंद्रबिंदू मानून, माणसाची महानता प्रकट करण्याचं ध्येय उराशी बाळगून कथालेखन करणाऱ्या बाबुराव बागुल यांच्या कथांनी दलित जाणिवेची घुटी उगाळून प्यायली आहे. अतिशुद्र हा समाजाचा केंद्र आहे ही भूमिकाच आव्हानात्मक आहे. त्यांच्या बंडखोर नायक नायिका भूक आणि वासना, दुःख आणि दैन्य, करूणा आणि चीड यांच्या आवर्तात सापडल्या आहेत. असे असूनही देवधर्म, जातपात, अंधश्रद्धा यावर तुटून पडल्या आहेत. भीषण तिरस्करणीय व भयावह दलित जीवनाचे सच्चे चित्र बाबुराव बागुल यांनी रेखाटले हे मात्र खरे"[01]

बाबुराव बागुल यांच्या कथेत डॉ.अनिल गजभिये यांनी सांगितलेली सर्व वैशिष्ट्ये आपल्या लक्षात येतात. त्यांच्या सर्व कथा झोपडपट्टीत, दारिद्र्यात असणाऱ्या वर्गांच्या कथा आहेत. बाबुराव बागुल यांची ही कथा स्वतःचा वेगळा वेग आणि समग्र परिघ घेऊन शब्दरूप धारण करते.

'महाराष्ट्र टाईम्स' च्या एका विशेषांकात त्यांच्या कथालेखनाबद्दल मत व्यक्त करताना म्हटले आहे. "बाबुरावांच्या कथेबद्दल लिहिणे हे एक अवघड काम आहे. त्यांच्या भाषेतील बेरकी रांगडेपणा व हादरवून सोडणारे अनुभवविश्व संपूर्ण कथेला ओलांडून पुढे जाणारे आहे आणि म्हणूनच पारंपरिक कथामूल्यांच्या चौकटीत ती बसू शकत नाही. दलित साहित्याच्या वेगळ्या समीक्षेची गरज का आहे. याचे उत्तर येथे सापडते."[02]

झोपडपट्टीच्या दोनच प्रेरणा आहेत. भूक आणि वासना. झोपडपट्टीतील पुढची भावी पिढी म्हणजे लहान लहान मुले मात्र ती गलिच्छ वस्ती, उघडे नागडे स्त्रीपुरूष संबंध, चोरीमारी व व्यसनांधता या माणसांना पशू बनविणाऱ्या वातावरणात वाढत असतात.

शिरिष पै यांनी बाबुराव बागुल यांच्या कथेच्या संदर्भात विश्लेषण करताना म्हणतात, "त्यांना जे सांगायचे असते, ते भीषण तिरस्कारणीय व भयावह असते. इतके की त्याच्यासाठी शब्द शोधण्याच्या कमालीच्या यातना त्यांना सहन कराव्या लागत असतील. जीवनाची अधःपतीत बाजू रंगवायची आणि तीही संयम सांभाळून आणि वाचकांच्या अभिरूचीला धक्का न लागू देतीं."[03]

बाबुराव बागुल यांनी कथेचे रूढ रूप नाकारले. त्यांनी कथेत खराखुरा जीवनानुभव मांडला आहे. बाबुराव बागुल स्वतः जे जीवन जगले ते जीवन यातनामय, तिरस्करणीय व भयावह होते. तेच त्यांनी शब्द रूपाने कथेत मांडले आहे. बाबुराव बागुल यांचे कथा साहित्य पुढील प्रमाणे आहे.

1) 'जेव्हा मी जात चोरली' (1969)
2) 'मरण स्वस्त होत आहे'

## *3.बाबुराव बागुल यांच्या कथेतील बालव्यक्तिरेखा : विविध वृत्ती–प्रवृत्ती*

बाबुराव बागुल यांच्या कथेत फार बालव्यक्तिरेखा आलेल्या नाहित. त्यांची संख्या अगदी मोजकीच आहे. मात्र त्या आपल्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. त्यातील महत्त्वाची बालव्यक्तिरेखा म्हणजे दानियल. ही 'सक्तमजूरी' या कथेतील आहे. या कथेतील छोट्या दानियलला समवयस्क मुलांमध्ये खेळावेसे वाटते. तुटून आलेल्या पतंगामागे धावावेसे वाटते. परंतु परिस्थितीमुळे तो खेळाचा आनंद घेऊ शकत नाही. त्याच्या वडिलांनी त्याला पोलीसांवर नजर ठेवायला सांगितलेले असते. ही जबाबदारी त्याला चोखपणे पार पाडायची असते. यातच तो कालपासून उपाशी असतो. त्यातुनही त्याची अगतिकता लक्षात येते. परंतु एक दिवस त्याचा बालसुलभ स्वभाव उसळी मारून बाहेर येतो आणि तो पतंगामागे भान विसरून धावत सुटतो. बालमनाच्या मानसिक अवस्थांचे चित्रण बाबुराव बागुल अतिशय हळूवारपणे करतात.

दानियल हा फर्नांडिस या जुगाऱ्याचा लहान मुलगा असतो. कालपासून उपाशी असल्यामुळे तो भूकेने व्याकूळ झालेला असतो. फर्नांडिस हा त्याच्याकडे पोलिसांवार नजर ठेवण्याचे काम सोपवतो. दानियलला आशा वाटते आपल्या बापाचा धंदा होईल व आपल्याला हॉटेलमध्ये जाता येईल व पोटभर जेवण खायला मिळेल. या आशेवर तो राहतो पण त्याच्या वडिलांचा धंदा होत नाही. परिणामी त्याला जेवण मिळत नाही. त्याला समोर हॉटेलमध्ये जाऊन पाणी प्यावेसे वाटते. पण वडिलांनी सोपवलेले काम सोडून जर आपण पाणी पिण्यासाठी गेलो असे समजले तर आपल्याला लाथाबुक्यांचा मार खावा लागेल या भीतीने तो पाणी पिण्यासाठी जात नाही. डोळ्यात तेल घालून पोलिसांवर लक्ष ठेवतो. बापाने दिलेली सक्तमजूरीची शिक्षा तो कैद्यासारखी सहन करतो.

"भूकेने व्याकूळ झालेला दानियल आईच्या आठवणीने खिन्न होऊन रडू लागला. 'आपण रडत असल्याचे बापाच्या लक्षात येऊ नये म्हणून तो भितीने घाईघाई डोळे पुसत होता..."[04] या कथेत आपल्या समोर अगतिक, असह्य, भूकेने व्याकूळ झालेला दानियल उभा राहतो. तो खिन्न झालेला आहे, उदास आहे, वडिलांची भिती वाटते. त्यामुळे तो मोठ्याने रडू शकत नाही.

दानियलचे लक्ष आकाशातील पतंगाकडे जाते. बालसुलभ वृत्तीने तो पतंग पाहण्यात रमतो. आपल्याला वडिलांनी काही काम सांगितले आहे हे तो विसरून जातो. आणि त्याच क्षणी पोलिस येतात व दानियलच्या बापाला व त्याच्या साथीदारांना पकडतात. आपले दुर्लक्ष झाले याची खंत दानियलच्या बाल मनाला वाटते.

'आई' या कथेत दारिद्र्य आणि झोपडपट्टीतील वास्तव यांच्या पार्श्वभूमीवर आईच्या व मुलाच्या मनातील ताणतणावाचे चित्रण आलेले आहे. बालनायक 'पांडू' आणि त्याची विधवा आई यांच्या भावनिक संघर्षातून ही कथा आकाराला येते. या दोघांच्यामध्ये भावनिक संघर्ष निर्माण होतात. झोपडपट्टीतील स्त्री पुरूष मंडळीच या संघर्षाला कारणीभूत होतात. त्याचबरोबर पांडूच्या आईची स्त्री म्हणून होणारी विटंबना, अवहेलना पांडूच्या मनावर त्याच्या शेजारच्या व शाळेतील मुलांनी केलेले संस्कार, या संस्कारातून त्याचे तयार झालेले मन व आईकडून मिळणारी वागणूक, शेजाऱ्या पाजाऱ्यांनी त्याच्या आईची केलेली विटंबना, अपमान याचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे.

षाळेत जाणारा सात आठ वर्षाचा कोवळा पांडू आपल्याच जातीच्या सोबत्यांमध्ये बहिष्कृत आहे. कारण लोकोपवादाप्रमाणे तिचे परपुरूषाशी संबंध आहेत. तिने एक मुकादम ठेवला आहे. एवढ्या कारणासाठी बरोबरीची मुले त्याचा

छळ करतात. कावळ्यासारखी त्याच्यावर तुटून पडतात.

"लाख्या साल्या तुझ्या 'बा'ला सांगतो – तू पांड्याशी बट्टी घेतलीस, त्याच्याशी बोललास, त्याच्या गळ्यात हात घालून उभा होतास. त्यानं तुला – मला या बाराच्या बेण्याशी बोलायचं मना केलं हाय. हे कडू बेणं हाय. घे कट्टी !"

या सर्व गोष्टीचा पांडूचा बालमनावर आघात होतो. त्याचे मन चोळामोळा होते व आपल्या प्रेमळ 'वात्सल्यसिंधू' आईबद्दल काढलेल्या अभद्र उद्‌गारामुळे तो भडकतो. प्रत्येकाचा जीव घ्यावा असे त्या बालमनाला वाटते. पण लगेच त्याला आपण अनाथ असल्याची जाणीव होते. बाहेर मुलांनी घातलेला बहिष्कार व घरात आईचे पांडूकडे होणारे दुर्लक्ष त्यामुळे तो व्याकूळ होतो. त्याच्या बालमनात अनेक विचार येतात. आईने खरोखर मुकादम ठेवला असेल काय?ही शंकाही त्याच्या मनात घर करते. याच कारणामुळे तिला घरी यायला उशिर होतो का? आणि एखादे दिवशी ती त्याला सोडून मुकादमासोबत पळून गेली तर आपले काय होईल? अन् मला कोण सांभाळील..... कोण खाऊ घालील? ही एकाकी पणाची भावना पांडूच्या मनात निर्माण होते. याच भावनेतून तो रडायला लागतो.

पांडूला आईच्या चारित्र्याबद्दल संशय आल्यामुळे पांडूच्या मनातील 'वात्सल्यसिंधू आई' बद्दलच्या कल्पनेला तडा जातो. पांडूचे बालमन दुभंगून जाते आणि तो घर सोडून निघून जातो. त्याच्या सुखासाठीच आईला हे अभद्र व्यवहार करावे लागतात याची पांडूच्या बालमनाला कल्पनाही नसते. ही जाणीव होण्याइतके पांडूचे वयही नसते.

रात्र झाल्यावर पांडू परत घरी येतो. तर त्याची आई त्याला खरोखरच मुकादमाच्या मिठीत दिसते. त्याचा संशय खरा ठरतो व पुन्हा परत न येण्यासाठी तो पळून जातो. त्याला धरण्यासाठी आई कासावीस होते परंतु मुकादमाच्या पोलादी मिठीतून तिला सुटता येत नाही. वासना व भूकेपायी मायलेकरांची ताटातूट होते.

'भूक' ही कथा ग्रामीण जीवनाच्या पातळीवरील आहे. या कथेतील बालनायक 'भिका' हा आपल्या गरिबीची समज असलेला, गरिबीचा वणवा कसा असतो याची कल्पना नसलेला निरागस 'सखा' आणि प्राण पणाला लावून आपल्या पोरांवर प्रेम करणारी व मायेची शाल पांघरणारी आई 'भागू कोळीण' या तीन व्यक्तिंच्या परस्पर संबंधातून ही कथा आकार घेते.

भागू भिकाला गावाच्या पाटलिणीकडे पीठ आणण्यासाठी पाठवते. भिकाला पाटलिणीकडे जायला आवडत नाही. कारण पाटलिण भिकाला रागवते, ओरडते, त्याचा अपमान करते. म्हणून भिका जायला तयार नसतो. पण परिस्थितीमुळे भिका हतबल होतो. आईच्या आज्ञेमुळे तो मनात नसतानाही पाटलिणीकडे जातो. तेथे पाटलिण त्याचा अपमान करते. त्यामुळे भिकाचा चेहरा उतरतो. ती भिकाला दहा घरचे शिळे कालवण अन् वाळले भकरीचे तुकडे देते. ते भिकाला आवडत नव्हते पण पोटातील भुकेमुळे भिका नाईलाजाने खातो. हे पाहून भागा नदीवर मासे पकडण्यास जाण्यासाठी तयार होते. आपल्या दोन्ही मुलांना सोबत घेऊन ती नदीवर जाते.

नदीवर भागा मासे पकडते. आईने पकडलेले मासे भिका गावात विक्रीसाठी घेऊन जातो. मासे विक्रीतून आलेल्या पैशातूनच त्याला आईने सांगितलेल्या कण्या आणायच्या असतात. "स्वयंपाकाच्या वेळेच्या आत गेले तरच मासे छान किमतीने विकले जातात. नाहीतर गिऱ्हाईक मिळत नाही. अन् मिळाले तरी पैसे होत नाही. या धास्तीने सर्व विसरून जीव तोडून तो धावत होता. डोक्यावरील टोपलीतून मासे खाली पडत होते. ते पडलेले मासे उचलायचे भानही त्याला नव्हते. तो तसाच धावत, पळत, धापा टाकत गावात शिरला."

भिकाला लहान वयातही जबाबदारीची जाणीव होती. वेळेत मासे विक्रीला गेलो तरच माशांना चांगला भाव मिळेल याची जाणीवही होती. या जाणिवेतून भिका धावत पळत मासे विक्रीसाठी येतो. या धावपळीत त्याच्या टोपलीतील मासे खाली पडत होते. ते उचलण्याचे भानही त्याला नव्हते. बालवयातील जबाबदारीची जाणीव असलेला भिका आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो.

दारिद्र्यामुळे, गरीब परिस्थितीमुळे भिकाला अपमान सहन करावा लागतो. हा अपमान, उपेक्षित जीणे याचा त्याच्या बालमनावर परिणाम होतो. घरातील गरिबीमुळे त्याला दारोदार भिक मागावी लागते. या सर्वातून त्याच्या बालमनाचा होणारा कोंडमारा बाबुराव बागुलांनी 'भूक' या कथेत चित्रित केला आहे.

### *4.समारोप*

बाबुराव बागुल यांच्या कथेतून जीवनातील वास्तवतेचे भयानक दर्शन घडते. बागुलांच्या कथेतील माणसे ही समाजाने दूर फेकलेली सामान्य माणसे आहेत. त्यांच्या या भयानक जीवनाला समाज व्यवस्था जबाबदार आहे असे बागुलांना वाटते. 'दानियल' या बालनायकाला गरिबीमुळे बालपण उपभोगता येत नाही, खेळताही येत नाही. तहान लागली तरीही पाणी पिण्यासाठी जाता येत नाही. आपण जर पाणी पिण्यासाठी गेलो तर आपल्याला लाथा – बुक्यांचा मार खावा लागेल ही भीती दानियलच्या बालमनामध्ये आहे.

'पांडू'चे बालविश्व समाजातील लोकांनी उध्वस्त केले आहे. त्याच्या बरोबरीची मुले त्याला खेळात सहभागी करून घेत नाहीत. त्याची टिंगल टवाळी करतात. त्याला वत्याच्या आईला घाणेरडे बोलतात या सर्वांचा पांडूच्या बालमनावर विलक्षण परिणाम होतो. पांडूचे निरागस बालविश्व उध्वस्त होते.

'भिका'लाही गरिबीमुळे दहा घरचे शिळे तुकडे खावे लागतात. वेळोवेळी झालेला अपमान सहन करावा लागतो. बागुलांच्या कथेतील या बाल व्यक्तिरेखा सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे अगतिक झालेल्या आहेत.

बाबुराव बागुल यांच्या कथेत फार बालव्यक्तिरेखा आलेल्या नाहित. बालमनाच्या मानसिक अवस्थांचे चित्रण बाबुराव बागुल अतिशय हळूवारपणे करतात. या सर्वातून बालमनाचा होणारा कोंडमारा चित्रित केला आहे.

### *संदर्भ– टीपा*

1) गजभिये अनिल, 'दलित साहित्य : विचार आणि वैभव', श्री अहिल्या प्रकाशन, इंदूर,दि. 11 मे 1991, पृ. 18 – 19.
2) 'दलित साहित्य पुरवणी', 'महाराष्ट टाईम्स', 15 ऑक्टोबर 1972
3) पै शिरीष, प्रस्तावना, 'जेव्हा मी जात चोरली', लेखक बागुल बाबुराव, अक्षर प्रकाशन, सातवी आवृत्ती, फेब्रुवारी 2009, पृ.3
4) बागुल बाबुराव, 'मरण स्वस्त होत आहे', लोक वाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, पृ.15
5) तत्रैव, पृ.30
6) तत्रैव, पृ.25

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

* Google Scholar
* EBSCO
* DOAJ
* Index Copernicus
* Publication Index
* Academic Journal Database
* Contemporary Research Index
* Academic Paper Databse
* Digital Journals Database
* Current Index to Scholarly Journals
* Elite Scientific Journal Archive
* Directory Of Academic Resources
* Scholar Journal Index
* Recent Science Index
* Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net